


उष्णतेच्या लाटेमुळे शहाळी विक्री वाढली पान ३ वर


आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com




मुंबई इंडियन्सची फायनलमध्ये धडक पान ४ वर

वेर्णा, शनिवार, १५ मार्च २०२५ | पाने ४ | ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 192 | Verna, | facebook.com/dainikherald | Saturday 15 March 2025 | Pages 4 | ₹ 4

# शालेय शैक्षणिक वर्षासाठी नवीन मसुदा नियम जारी

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. १४ : राज्य शिक्षण विभागाने इयत्ता सहावी ते दहावी आणि बारावीच्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात एप्रिलपासून करण्यासंबंधी मसुदा नियम जारी केले आहेत. या नव्या नियमांनुसार, शैक्षणिक वर्षाच्या अखेरीस आणि नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला एक आठवड्याची विश्रांती असेल.**

शालेय शिक्षण संचालनालयाने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, इयत्ता पहिली ते पाचवी आणि नववीचे शैक्षणिक वर्ष साधारणतः जूनमध्ये सुरू होऊन एप्रिलमध्ये संपेल. इयत्ता सहावी ते दहावी आणि बारावीचे शैक्षणिक वर्ष एप्रिलपासून सुरू होऊन मार्चमध्ये संपेल. मात्र, या वर्गांसाठी शैक्षणिक वर्षाच्या शेवटी आणि नव्या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला एक आठवड्याचा ब्रेक असेल. शिक्षण संचालक योग्य वाटल्यास आदेश जारी करून शैक्षणिक वर्षाचे नियोजन करू शकतात, असे अधिसूचनेत स्पष्ट करण्यात आले आहे.

नव्या मसुदयानुसार सर्व वर्गांसाठी १ मेपासून पाच आठवड्यांची



उन्हाळी सुट्टी असेल. ऑक्टोबर किंवा नोव्हेंबर महिन्यात तीन आठवड्यांची दिवाळी सुट्टी असेल किंवा परिस्थितीनुसार दोन्ही महिन्यांत विभागली जाईल. गणेशोत्सवासाठी शिक्षण संचालक एका आठवड्यापेक्षा अधिक कालावधीसाठी सुट्टी जाहीर करू शकतात. मात्र, या सुट्टीमुळे कामकाजाच्या दिवसांचे नुकसान इतर सुट्ट्या कमी करून भरून काढले जाईल. २४ डिसेंबर ते २ जानेवारीदरम्यान नाताळची सुट्टी असेल.

शालेय शिक्षण विभागाने १२ रोजी जारी केलेल्या अधिसूचनेत स्पष्ट केले आहे की, या मसुदा नियमांबाबत सर्व आक्षेप आणि सूचना पाच दिवसांच्या आत शिक्षण संचालनालयाच्या संचालकांकडे सादर कराव्यात. संबंधित आक्षेप आणि सूचनांचा विचार करून अंतिम नियमांना मंजुरी दिली जाईल. ही अधिसूचना अधिकृत राजपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून पाच दिवसांच्या आत शासनाने या नियमांचा विचार करून निर्णय घेण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

## मंत्रिमंडळ फेरबदल १५ दिवसांत : तवडकर

■ टीम दैनिक हेराल्ड



**पणजी, दि. १४ :** येत्या १५ दिवसात सावंत सरकारच्या मंत्रिमंडळाची फेररचना होणार असल्याचे सभापती रमेश तवडकर यांनी स्पष्ट केले आहे .गेल्या अनेक दिवसांपासून मंत्रिमंडळ फेरबदलाची चर्चा असून विशेषत: अलीकडे झालेल्या दिल्लीमधील भाजपच्या वरीष्ठ नेत्यांच्या गोवा दौऱ्यानंतर या शक्यतेने जोर धरला आहे.

याबाबत पत्रकारांशी बोलताना तवडकर म्हणाले, सरकार मंत्रिमंडळ फेरबदलासाठी जास्त वेळ घेणार नाही आणि पुढील १५ दिवसांत हे प्रकरण निकाली निघेल. कोण मंत्रिमंडळात असेल आणि कोण बाहेर असेल हे लवकरच स्पष्ट होईल.मंत्रिमंडळात प्रवेशासाठी नीलेश काब्राल, दिगंबर कामत, संकल्प आमोणकर, डेलिया लोबो आणि मायकेल लोबो यांची नावे चर्चेत असल्याचे तवडकर यांनी सांगितले. हा प्रश्न आता फार काळ अनिश्चित राहणार नाही, असे त्यांनी नमूद केले.

या महिन्याच्या पहिल्या आठवड्यात भारतीय जनता पक्षाचे (भाजप) सरचिटणीस (संघटना) बी.एल. संतोष यांनी मुख्यमंत्री प्रमोद सावंत आणि इतर वरिष्ठ पक्ष नेत्यांची भेट घेतली होती. मुख्यमंत्री, भाजप आमदार आणि मंत्र्यांसोबतच्या एक-एक बैठका पणजीतील एका हॉटेलमध्ये पार पडल्या. सावंत यांनी कोणताही खुलासा करण्यास नकार दिला असला तरी, त्यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये फेरबदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## निवडक

### रान्या रावचा जामीनअर्ज फेटाळला

**बंगळुरू, दि. १४ :** सोन्याच्या तस्करी प्रकरणात अटकेत असलेली कन्नड अभिनेत्री रान्या राव हिला जामीन देण्यास आर्थिक गुन्ह्यांच्या विशेष न्यायालयाने नकार दिला आहे. रान्या रान हिच्यावर असलेले आरोप गंभीर स्वरुपाचे असल्याचे सांगत कोर्टाने जामिनाची याचिका फेटाळली आहे. यावेळी न्यायाधीश विश्वनाथ सी. गौदार यांच्या न्यायालयाने रान्या राव हिला न्यायालयीन कोठडीत ठेवण्यात यावे या सरकारी वकिलांच्या मागणी मान्य केली.रान्या राव हिला एका हाय प्रोफाइल सोने तस्करी प्रकरणात अटक करण्यात आली आहे. यापूर्वी तिने मॅजिस्ट्रेट कोर्टात जामिनासाठी अर्ज केला होता जो फेटाळण्यात आला होता. त्यानंतर तिने आर्थिक गुन्ह्यांशी संबंधित विशेष न्यायालयात धाव घेतली मात्र येथे देखील तिची याचिका फेटाळण्यात आली आहे. अभिनेत्री रान्य राव हिला ४ मार्च २०२५ रोजी १४.८ किलोग्रॅम सोन्याची तस्करी करण्याच्या प्रयत्न करताना अटक करण्यात आली. या सोन्याची किंमत भारतात सुमारे १२ कोटी रुपये आहे. दुबई येथून कर्नाटकच्या बंगळुरू येथील केम्पेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरल्यानंतर तिला अटक करण्यात आली होती.

-----------

### कारगिलमध्ये भूकंपाचे धक्के

**जम्मू, दि. १४ :** कारगिल आणि अरुणाचल प्रदेशमध्ये शुक्रवारी दोनवेळा भूकंप झाला. पहिला भूकंप उत्तर भारतात झाला. या गोंधळाचे केंद्रबिंदू लडाख या केंद्रशासित प्रदेशातील कारगिल परिसर होता. रात्री उशिरा २.५० वाजता येथे भूकंपाचे धक्के जाणवले. कारगिल भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ५.२ इतकी होती. या भूकंपाचे केंद्र जमिनीपासून फक्त १५ किमी खोलीवर होते. भूकंप रात्री उशिरा झाला, त्यामुळे बहुतेक लोकांना त्याबद्दल माहिती नव्हती. पण ज्याला कळले, तो लगेच घराबाहेर पळून गेला. कारगिल परिसरात रात्रीचे तापमान खूपच कमी असल्याने, येथे अजूनही थंडी सुरूच आहे. आज सकाळी ६.०१ वाजता अरुणाचल प्रदेशातील पश्चिम कामेंग येथे दुसरा भूकंपाचा धक्का जाणवला. येथे भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ४ मोजण्यात आली. भूकंपाचे केंद्र जमिनीपासून फक्त १० किमी खोलीवर होते.

--------------

### पाकमध्ये मशिदीत मोठा बॉम्बस्फोट

**कराची, दि. १४ :** पाकिस्तान नुकताच एका रेल्वेवर झालेला दहशतवादी हल्ला व अपहरणाच्या घटनेनंतर पाकिस्तानमधील खैबर पख्तुन्वा प्रांतातील दक्षिण वजीरिस्तानमधील आझम बरसात बाजारात असलेल्या एका मशिदीत मोठा बॉम्बस्फोट झाला आहे. दहशतवाद्यांनी जमीयत उलेमा-ए-इस्लाम वानाच्या मौलाना अब्दुल अजीज मशिदीचे प्रचारक मौलाना अब्दुल्लाह नदीम यांना लक्ष्य केलं आहे. या बॉम्बस्फोटात मौलाना नदीम यांच्यासह अनेक जण जखमी झाले आहेत. मौलाना अब्दुल्ला नदिम यांच्यावर यापूर्वी देखील अशाच प्रकारचा हल्ला झाला होता. एका रिमोट कंट्रोल्ड स्फोटातून ते बचावले होते. त्यांना जीवे मारण्यासाठी कलुशाह येथे दहशतवाद्यांनी स्फोट घडवून आणला होता. त्या स्फोटातून ते बचावले. मात्र, ते जखमी झाले होते. आता त्यांना मारण्यासाठी पुन्हा एकदा दहशतवाद्यांनी स्फोट घडवून आणला आहे. या हल्ल्यातही ते वाचले आहेत.

### हवामान

कमाल : ३८ किमान : २७
आर्द्रता : ६१

### बाजार भाव

सोने : ₹ ८९,१०५ (१० ग्रॅम)
चांदी : ₹ १,०५,१०० (१

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ८२,३६५ .७७ ↑ (२३१.१६ )
निफ्टी : २५,२३५.९० ↑ (८३.९५)

## दुचाकी न सांगता नेल्याने भावाचा भावाकडून खून

### सडा येथील घटना : मोठ्या भावाला अटक

■ टीम दैनिक हेराल्ड





**वास्को, दि. १४ :** आपल्याला न सांगताच दुचाकी घेऊन गेल्याचा क्षुल्लक राग मनात ठेवत धाकट्या भावाने आपल्या मोठ्या भावाचा चाकूने वार करत खून केल्याची खळबळजनक घटना सडा-वास्को येथे गुरुवारी होळीच्या पूर्वसंध्येला घडली. सदर प्रकार सडा येथील गोवा पुनर्वसन मंडळाच्या वसाहतीमध्ये घडला. श्रीकांत घेवारी (५० वर्षे) असे मृत व्यक्तीचे नाव आहे.

याप्रकरणी मुरगाव पोलिसांनी पंचनामा करून धाकटा भाऊ मल्लिकार्जुन घिवारी (४५) याच्याविरोधात गुन्हा नोंद करून अटक केली.

सडा येथील जीआरबी कॉलनी कॉलनीमध्ये राहणारे घिवारी कुटुंबातील श्रीकांत (५०) व मल्लिकार्जुन (४५) व छोटा भाऊ महेश, आईवडील व कुटुंबातील इतर सदस्यांसमवेत राहत होता. श्रीकांत 'दृष्टी'मध्ये मध्ये कामाला होता. तर मल्लिकार्जुन सुरक्षकारकाचे काम करत आहे. मल्लिकार्जुन अनेकवेळा भावाला न सांगताच त्याची दुचाकी घेऊन फिरायला जात असे. गुरूवारी रात्री मल्लिकार्जुन पुन्हा मोठ्या भावाची दुचाकी घेऊन गेला होता. रात्री उशिरा तो घरी परतल्यानंतर या भावांमध्ये साडेदहाच्या दरम्यान वाद निर्माण झाला. आपली दुचाकी न सांगता घेऊन गेल्याबद्दल मल्लिकार्जुन याने श्रीकांतला जाब विचारला. वाद वाढतच गेला. अचानक संतापलेल्या मल्लिकार्जुन याने चाकूने श्रीकांत याच्यावर वार केले. त्यामुळे गंभीर जखमी झालेला श्रीकांत तेथेच निपचित पडून राहिला. दोघांच्या भांडणाच्या आवाजामुळे तेथे जमा झालेल्यांनी सदर घटनेची माहिती मुरगाव पोलिसांना दिली. दरम्यान गंभीर जखमी झालेल्या श्रीकांतला सावरत उपचारासाठी चिखली उपजिल्हा इस्पितळात नेण्यात आले. तथापी तेथे त्याला मृत घोषित करण्यात आले. याप्रकरणी मुरगाव पोलिसांनी मल्लिकार्जुनला अटक केली असून पुढील तपास पोलिस करत आहेत.

## रंगांची उधळण....!



पणजी : राज्यात शुक्रवारी रंगपंचमी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सकाळपासूनच रंगोत्सवाला सुरुवात केली. येथील आझाद मैदानावर आयोजित रंगोत्सवात डिजेच्या ठेक्यावर लहान मुलांसह अबाल वृद्धांपर्यंत सर्वांनीच ताल धरला. गायकांनी गायिलेल्या लाईव्ह गाण्यावरही नाचण्याचा आनंद लुटला. (उपेंद्र नाईक)

## टीटीएजीकडून पर्यटनक्षेत्राच्या विकासासाठी सविस्तर शिफारसी

### गोव्याचे नैसर्गिक सौंदर्य जपण्यावर भर, वाहतूक व्यवस्थेत तंत्रज्ञानाचा वापर करून दरांमध्ये पारदर्शकता आणण्याचे नमूद

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १४ :** ट्रॅव्हल अँड टुरिझम असोसिएशन ऑफ गोवा (टीटीएजी) ने मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांना आगामी राज्य अर्थसंकल्पासाठी पर्यटनक्षेत्राशी संबंधित सविस्तर शिफारसी सादर केल्या आहेत. या शिफारसींमध्ये गोव्याचे नैसर्गिक सौंदर्य आणि सांस्कृतिक वारसा जपणे, पायाभूत सुविधा सुधारणा, कर सवलती आणि शाश्वततेवर भर देण्यात आला आहे.

टीटीएजीने आपल्या पत्रात गोव्याच्या पर्यावरण संरक्षणाची तातडीची गरज अधोरेखित केली आहे. पर्यटकांसाठी मुख्य आकर्षण असलेल्या गोव्याच्या स्वच्छतेची आणि पर्यावरणीय संतुलनाची काळजी घेण्यासाठी, कचरा व्यवस्थापन आणि स्वच्छता सुधारणा यासारख्या उपाययोजना



राबवण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच, वाहतूक व्यवस्थेत तंत्रज्ञानाचा वापर करून दरांमध्ये पारदर्शकता आणण्यावरही भर देण्यात आला आहे, जेणेकरून पर्यटकांचा अनुभव अधिक सुखकर होईल. सुरक्षिततेच्या दृष्टीने टिटीएजी ने पर्यटन क्षेत्रात प्रभावी पोलिसिंग आणि देखरेखीची गरजही व्यक्त केली आहे.

दारूवरील कर आकारणीबाबत,टिटीएजी ने बिअर, वाईन आणि स्थानिकरित्या डिस्टिल्ड मद्यांवरील मूल्यवर्धित कर (व्हॅट ) १० टक्के पर्यंत कमी करण्याचा प्रस्ताव मांडला आहे. टिटीएजी चे अध्यक्ष जॅक सुखीजा यांनी सांगितले की, सध्याच्या उच्च कर दरांमुळे पर्यटक स्वतःचे मद्य आणण्याचा कल वाढला आहे, विशेषतः लग्न समारंभ आणि कॉर्पोरेट कार्यक्रमांसाठी, ज्यामुळे राज्य सरकारला महसूल तोटा सहन करावा लागत आहे. मुंबईतील कर दराशी समानता साधल्यास स्थानिक खरेदीला चालना मिळेल आणि महसूलवाढ होईल, असा विश्वास सुखीजा यांनी व्यक्त केला.

टीटीएजी ने गोव्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर एक प्रमुख पर्यटन स्थळ म्हणून प्रस्थापित करण्यासाठी धोरणात्मक पावले उचलण्याची गरज व्यक्त केली आहे. लंडनमधील वर्ल्ड ट्रॅव्हल मार्केट , आयटीबी बर्लिन, बीटीएल पोर्तुगाल आणि फायचर स्पेनसारख्या प्रमुख पर्यटन महोत्सवांत गोव्याने भाग घ्यावा, अशी शिफारस करण्यात आली आहे. याशिवाय, एंमआयटीटी रशिया, एटीएम दुबई आणि आयटीबी आशिया यांसारख्या कार्यक्रमांत वार्षिक सहभागाची मागणी केली आहे. देशांतर्गत बाजारपेठ वाढवण्यासाठी मुंबई, दिल्ली, जयपूर आणि कोलकाता व अहमदाबाद येथे उपस्थिती लावण्याची सूचना करण्यात आली आहे. तसेच, टियर २ आणि टियर ३ शहरांमध्ये रोड शो आयोजित करून गोव्याचे पर्यटन विस्तार करण्याचे महत्त्व टीटीएजीने अधोरेखित केले आहे.

टीटीएजीने गोव्यात जागतिक दर्जाचे कन्व्हेन्शन सेंटर आणि कार्यक्रम स्थळ विकसित करण्याची गरज व्यक्त केली आहे. २०२५ च्या केंद्रीय अर्थसंकल्पानुसार संपूर्ण भारतभर ५० कन्व्हेन्शन सेंटरसाठी २० हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. अशा सुविधांमुळे गोवा आंतरराष्ट्रीय परिषदा, कॉर्पोरेट कार्यक्रम आणि मोठ्या प्रमाणातील प्रदर्शनांचे केंद्र बनेल आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठा फायदा होईल, असे सुखीजा यांनी सांगितले.

पर्यटनाशी संबंधित कार्यक्रमांसाठी मंजुरी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी टीटीएजी ने एकल-खिडकी प्रणाली लागू करण्याची शिफारस केली आहे. यामुळे नोकरशाहीतील विलंब कमी होईल आणि आयोजकांना कार्यक्रमांचे नियोजन आणि अंमलबजावणी करणे सोपे होईल. यामुळे गोव्यात अधिक उच्च-प्रोफाइल कार्यक्रम आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील संमेलनांचे आयोजन शक्य होईल.

टीटीएजी ने शाश्वततेला प्राधान्य देण्याची गरज अधोरेखित केली आहे. फ्लेक्स प्लास्टिक आणि थर्माकोलच्या वापरावर बंदी घालण्याची मागणी असोसिएशनने केली आहे. पर्यावरणपूरक धोरणे राबवल्यास पर्यावरण-जागरूक पर्यटक आणि कार्यक्रम आयोजक गोव्याकडे आकर्षित होतील आणि गोवा एक जबाबदार पर्यटनस्थळ म्हणून अधिक प्रसिद्ध होईल, असे टीटीएजीने स्पष्ट केले आहे.

टीटीएजी च्या या शिफारसींवर सरकारने सकारात्मक प्रतिसाद द्यावा आणि गोव्याचे पर्यटन क्षेत्र जागतिक स्तरावर बळकट करण्यासाठी त्वरित उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.